आज़ादी का अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 8, Vol. I, Issue- LXIX, 14 Oct. 2022



## स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास व सामाजिक परिणामकारकता

मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. आनंद घन

संपादक
डॉ. गणेश माने

सहसंपादक
डॉ. वसंत सरवदे
डॉ. विजयकुमार सोन्नर

Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# INDEX



| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | CONCEPT OF FREEDOM IN RABINDRANATH TAGORE'S '*WHERE THE MIND IS WITHOUT FEAR*' | Dr. Nasreen B. L. Shaikh | 01 |
| 02. | ARTICLE 370 | Syed Bushra Nahid Rahim | 04 |
| 03. | ARTICLE – 370 | Dr. Baban K. Sonwane | 06 |
| 04. | CONTRIBUTION MAHARASHTRIAN WOMEN FOR INDIAN FREEDOM MOVEMENT | Mr. Prashant Vasant Ransure | 10 |
| 05. | A STUDY ON THE HISTORY OF ECONOMICE DEVELOPMENT IN INDIA SINCE INDEPENDENCE | Dr. Sunil Tukaram More | 15 |
| 06. | Dr. A. P. J. Abdul Kalam's Visions for India and Present Scenario | Dr. Tukaram B. Bobade | 18 |
| 07. | India's Economic development and five Year plans in Independence Era. | Dr. Madhu Prabhakar Khobragade | 21 |
| 08. | Economic Development of Post-Independence India | Dr. B. M. Sonawane | 25 |
| 09. | Role of Sarojini Naidu, the Nightingale of Indiain The Civil Disobedience Movement | Dr. Manasi G. Swami | 29 |
| 10. | Growth of Libraries in India after Post-Independence: An Overview | Ganesh Sheshrao Ghatole<br>Dr. Kalyan N. Kumbhar | 31 |
| 11. | INDIAN WOMEN'S CRICKET AND CHALLENGES: A STUDY | Dr. Vitthal Dumnar | 39 |
| 12. | NEHRU AND SECULARISM: A STUDY | Mr. Rahul P. Salve | 42 |
| 13. | RURAL DEVELOPMENT-AN OVERVIEW | Dr. Rahul N. Dhumal | 46 |
| 14. | PRATHANA SAMAJ AND ITS RELEVANCE TO MODERN ERA | Dr. Nalini Avinash Waghmare | 50 |
| 15. | भारत की सुरक्षा के समक्ष चुनौतियाँ<br>Challenges before Security in India | Dr. Alpana Vaidya | 55 |
| 16. | स्वाधीनता संग्राम मे हिंदी साहित्य की भूमिका | प्रा. डॉ. जाधव के. के. | 58 |
| 17. | स्वातंत्र्योत्तर आम आदमी की पीड़ा<br>(विशेष संदर्भ : डॉ. कुँअर बेचैन की ग़ज़लें) | प्रा. डॉ. बंग नरसिंगदास ओमप्रकाश | 63 |
| 18. | समस्या की जड़ : अनुच्छेद 370 | ममता शत्रुघ्न माली | 66 |
| 19. | स्वतंत्र भारत सरकार समोरील निर्वासितांच्या समस्या | प्रा. डॉ. गणेश गोविंदराव माने | 71 |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist.Parbhani




| | | | |
|---|---|---|---|
| 20. | स्वातंत्र्योत्तर कालखंड आणि लोकप्रशासन | प्रा. डॉ. वसंत पांडुरंग सरवदे | 77 |
| 21. | स्वातंत्र्योंतर काळातील शारीरिक शिक्षणाचे योगदान | प्रा. डॉ. देवकते उत्तम शेषराव | 82 |
| 22. | माहिती अधिकाराचा लोकप्रशासनावरील प्रभाव | डॉ. पिनाटे किरण प्रल्हादराव | 86 |
| 23. | भारतीय प्रशासनासमोरील आव्हाने – एक चिंतन | प्रा. डॉ. गंगाधर रामकृष्ण भोसले | 89 |
| 24. | स्वातंत्र सैनिक व भारतीय राजकारण | प्रा. डॉ. एम. एफ. राऊतराहे | 93 |
| 25. | लोकशाहीवादी शासनाची भूमिका | प्रा. डॉ. विजयकुमार सोन्नर | 96 |
| 26. | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय लोकशाही पुढील आव्हाने : एक अभ्यास | प्रा. डॉ. सारिका विष्णू केदार | 100 |
| 27. | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतापुढील आव्हाने | प्रा. लतिका हिरालाल पंडूरे | 103 |
| 28. | मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्ये | प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा | 107 |
| 29. | भारतीय स्वातंत्र्याचा अखेरचा लढा | प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा | 110 |
| 30. | आदिवासी भिल्ल जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी | प्रा. शामसिंग रामसिंग वळवी | 114 |
| 31. | दहशतवाद : भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हान | प्रा. डॉ. एस. पी. ढाके<br>प्रा. दिपकराव बी. देवरे | 118 |
| 32. | महाराष्ट्रातील महिलांचे भारतीय स्वतंत्र चळवळीतील योगदान | डॉ. जाधव दत्ता उध्दव | 124 |
| 33. | भारतीय राज्यघटनेचा ऐतिहासिक संदर्भ | डॉ. जी. डी. घोडे | 130 |
| 34. | स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रंथालयाची भुमिका | श्री. गोवर्धन गुलाबराव जोगदंड | 136 |
| 35. | मूकनायक आणि आजची पत्रकारिता | प्रा. डॉ. जी. पी. फसले | 141 |
| 36. | महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचाराची सद्यस्थितीतील उपयुक्तता | प्रा. महेश शिवाजीराव जाधव | 147 |
| 37. | स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राचे कृषी औद्योगिक धोरण एक चिकित्सक अभ्यास | डॉ. मुळे पी. एम. | 151 |
| 38. | महाराष्ट्रातील समाज सुधारणा चळवळीचे स्वातंत्र्योत्तर काळातील योगदान | प्रा. डॉ. परमेश्वर वाल्मिक दहिफळे | 155 |

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani


| | | | |
|---|---|---|---|
| 74. | 'महिला सुरक्षिततेचे कायदे' | डॉ. सिंधू खंदारे | 307 |
| 75. | "महाराष्ट्रातील महिलांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान" | डॉ. शिवाजी सोमला पवार | 316 |
| 76. | लोकप्रशासनातील नव संकल्पना | प्रा. डॉ. एन. व्ही. शेवाळे | 328 |
| 77. | भारतीय राज्यघटनेतील ऐतिहासिक वारसा | प्रो. डॉ. मुक्ता सोमवंशी | 331 |
| 78. | "नागरी समाज आणि लोकप्रशासन : एक संशोधनात्मक अभ्यास " | डॉ. उलगडे लक्ष्मण काशिनाथ | 335 |
| 79. | स्वातंत्रोत्तर काळातील भारतीय राजकारणाची दिशा | मुकुंद येगावकर | 337 |
| 80. | स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचे परराष्ट्रीय धोरण | डॉ. घन आनंद लक्ष्मीकांत | 342 |
| 81. | स्वातंत्र्योत्तर भारतातील शैक्षणिक धोरण | पाटील अभय सखाराम | 349 |
| 82. | स्वातंत्र्योत्तर भारतीय प्रशासनाचा विकास | डॉ संतोष प्रभाकर गुट्टे | 354 |

Late Ramesh Warpudkar ... Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# भारतीय राज्यघटनेतील ऐतिहासिक वारसा

प्रो. डॉ. मुक्ता सोमवंशी
लोकप्रशासन विभाग प्रमुख, कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठजि.परभणी

भारत हा देश प्राचीन काळापासूनच वैभवशाली संस्कृतीचा म्हणून जगात सर्वत्र परिचित आहे. वर्तमान स्थितीत भारत हा जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखले जाते. सिंधू संस्कृती व बौद्ध तत्त्वज्ञानानुसार भारतात प्राचीन काळापासूनच स्वातंत्र्य, समता व न्यायाचा विचार रुजलेला दिसतो. याचबरोबर भारताला नैसर्गिक दृष्ट्या ही फार महत्त्व प्राप्त झालेले आहे. एकंदरीत भारत भूमीवर निसर्गाची फार मोठी कृपाच आहे असे म्हणता येईल. यामुळे प्राचीन काळापासूनच अनेक परकीय लोक भारताकडे आकर्षित झाले. डच, पोर्तुगाल, मोघल या पश्चिमात्य लोकांनी भारतात पाऊल ठेवले आणि येथील वातावरणाने ते प्रभावित झाले. तसेच मुघलांनी भारतावर आपले साम्राज्य प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून संपूर्ण भारतावर सत्ता प्रस्थापित केल्याचे इतिहासात आढळून येते. ब्रिटिशांनी व्यापाराच्या उद्देशाने भारतात पाऊल ठेवले. ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली आणि अल्पावधीतच या ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातूनच हळूहळू भारतातील राजकीय सत्ता मजबूत केली. या परकीयांच्या आक्रमणापूर्वी भारत हा अतिशय समृद्ध होता. मात्र या परकीय सत्ताधाऱ्यांनी भारतातील साधनसामग्रीचा वापर स्वतःच्या देशाच्या विकासासाठी अधिक प्रमाणात केला. ब्रिटिशांनी भारतावर दीर्घकाळ सत्ता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने नवनवीन कायदे करण्यावर भर दिला आणि कायदेशीर सत्ता निर्माण करून आपली पकड अधिक मजबूत केली. यामध्ये प्रामुख्याने मुंबई,कलकत्ता व मद्रास या ठिकाणच्या नगरपालिकांची स्थापना कायदेशीररित्या केली. आणि येथूनच निर्माण झालेल्या सर्व कायद्यांचा भारतीय राज्यघटनेवर प्रभाव पडलेला दिसून येतो.

भारतीय राज्यघटनेचा अभ्यास केला असता खालील महत्त्वाच्या कालखंडांचा राज्यघटनेवर प्रभाव पडलेला दिसून येतो.

प्राचीन भारतीय संस्कृती
ब्रिटिश संसदेचे कायदे
निरनिराळ्या देशाच्या राज्यघटनेतील आदर्श

**भारतीय संस्कृती:-**

'भारताला पाच हजार वर्षांची संस्कृती व गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. अशा या समृद्ध गौरवशाली इतिहासाचा प्रभाव आपल्या भारतीय संविधानावर आहे. त्यातूनच आपल्या देशाचे राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज व राष्ट्रीय मानचिन्हे निर्माण झालेली आहेत. जी आपल्या भारताच्या प्राचीन संस्कृतीची प्रतीक आहेत'. अशोक स्तंभावरील चार सिंहाचे तोंड असलेल्या स्तंभास आपण राष्ट्रचिन्ह म्हणून मान्यता दिलेली आहे. भारतीय संस्कृतीचे प्रतिक म्हणून सम्राट अशोकाकडे पाहिले जाते. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून शांततेचा संदेश जगभर पसरविण्यासाठी धम्मचक्र परिवर्तन केले आहे. त्यांच्या विचारांचा प्रभाव आपल्या आंतरराष्ट्रीय धोरणावर पडलेला दिसून येतो. आपला भारत हा विविधतेने नटलेला आहे, येथे अनेक भाषा,धर्म, वंश असलेले लोक राहतात. त्यांना एक धाग्यात गुंफून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणारे जनगणमन हे आपले राष्ट्रगीत अनेकातून एकात्मतेचे दर्शन घडविते.

भारतात ब्रिटिश डच पोर्तुगाल मोगल इत्यादी परकीय लोकांची आक्रमण झाली आणि त्यांनी आपली सत्ता भारतावर प्रस्थापित केली. मात्र त्याचवेळी भारतीय वंशाच्या अनेक राजांची सत्ता आहे भारतात अस्तित्वात होती. प्रामुख्यानेराजपूत, मराठे यांची छोटी छोटी संस्थाने किंवा जहागिरीच्या स्वरूपात सत्ता अस्तित्वात होती. वसवेश्वर

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



म[illegible]नी १२ व्या शतकात भारतात लिंगायत धर्माचा प्रचार आणि प्रसार करून एक समतेच्या दृष्टिकोनातून उत्तम राज्यव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. यासाठी त्यांनी सभा मंडप स्थापन केले होते. कबीरांनी सुद्धा भारतीय समाजातील रूढी प्रथा परंपरा अंधश्रद्धा यांच्यावर टीका करून समाजातील विषमता दूर करणाऱ्या धर्माचीनिर्मिती व्हावी यासाठी या समता न्याय तत्त्वांना प्रवर्धित करणारा धर्म स्थापन केला होता.

संत ज्ञानेश्वर व १७ व्या शतकातील संत तुकोबारय यांनीही समाजात समता निर्माण व्हावी यासाठी धर्मातील अयोग्य, विषमतावादी, अन्यायकारक तत्त्वांना विरोध केला. अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचा प्रयत्न राष्ट्रसंत तुकाराम महाराजांनी केला. याच काळात स्वराज्याची निर्मिती करणारे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतातील प्राचीन काळातील बौद्ध धर्माच्या शिकवणीनुसार महाराष्ट्रात स्वराज्य स्थापन केले. या स्वराज्याचा कारभार त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्त्वानुसार केला. म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना निर्मितीनंतर केलेल्या भाषणात म्हटले होते की, 'भारतीय राज्यघटनेची निर्मिती करणे तसे मला कठीण वाटले नाही. कारण माझ्यासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य होते'.

**ब्रिटिश संसदेचे कायदे:-**

भारतीय राज्यघटनेची निर्मिती करीत असताना घटना समितीला भारताच्या ऐतिहासिक घडामोडीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त होते. कारण इतिहास हा भविष्यकालीन निर्णयासाठी

मुलाधार असतो. त्यानुसार भारतीय घटनाकारांना ब्रिटिशांनी भारतीयांसाठी केलेल्या प्रत्येक कायद्याचा अभ्यास करणे गरजेचे होते. परिणामी भारतीय राज्यघटनेचा बहुतांश भाग ब्रिटिश कालीन कायद्यांचा आधार घेऊनच निर्माण करण्यात आलेला दिसून येतो.

१)१८३३ची सनद:-

'भारतीय राज्यघटनेच्या इतिहासात१८३३ किसना हा महत्त्वाचा टप्पा गणला जातो कारण या संसदेने कंपनीच्या घटनेत तसेच भारताच्या राज्यकारभारात महत्त्वाचे बदल घडवून आणले. कायदे पद्धतीत एकसूत्रीपणा आणण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आला. त्यानुसार कायदा मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एक भारतीय कमिशन स्थापन करण्यात आले. इंडियन पिनल कोड, सिविल प्रोसिजर व क्रिमिनल प्रोसिजर कोड हे कायदेविषयक ग्रंथ तयार करण्यात आले. या कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे या कायद्याची चौकट भारतात अद्यापही रूढआहे'१

**२) १८५३ ची सनद:-**

१८३३ च्या सणधेप्रमाणेच ही सनद ही भारताच्या राज्यघटनेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे कारण या कायद्यानेच भारतात कायदेमंडळाची सुरुवात झाली. संसदीय लोकशाहीचे एक आवश्यक अंग म्हणजे स्वतंत्र कायदेमंडळ यावेळी स्थापन करण्यात आले नसले, तरी अल्प प्रमाणात का होईना त्याची सुरुवात झाली.

**३) १८५८चा कायदा:-**

१८५८ कायद्याप्रमाणे दुहेरी राजवट संपुष्टात येऊन भारताचा कारभार प्रत्यक्षरीत्या पार्लमेंट कडून ब्रिटिश राजपदाच्या नावे करण्याची घोषणा करण्यात आली.

**४)इंडियन कन्सिल ॲक्ट १८६१:-**

या कायद्यामुळे हिंदी लोकांना प्रथमच कार्य मंडळाचे सदस्यत्व प्राप्त झाले. कायदे करण्याच्या कामात काही प्रमाणात भारतीय सदस्यांचे सहकार्य घेण्याचा प्रयत्न झाला. या कायद्याने प्रांतिक कायदेमंडळाची निर्मिती झाली.

**५) १९१९ चा कायदा:-**

१९१९ च्या सुधारणा कायद्यानुसार प्रथमच 'भारतामध्ये केंद्रात द्विग्रह सभागृहाची व्यवस्था करण्यात आली.ही व्यवस्था भारतीय घटनाकारांनी विद्यमान राज्यघटनेत स्वीकारली आहे'.२

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



६)१९३५ चा कायदा:-

१९३५ चा कायदा भारत प्रशासन कायदा म्हणून ओळखला जातो या कायद्यानुसार भारतात संघराज्याची निर्मिती करण्यात आली भारतीय राज्यघटनेच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वाचा आहे. या कायद्यामध्ये ३२१ कलमे व १९ परिशिष्टे होती. या कायद्यानुसार भारतात संघराज्याची निर्मिती करण्यासाठी विभागणी संघ सूची, समवर्ती सूची व प्रांत सूची अशी करण्यात आली. केंद्रस्थानी द्विग्रहात्मक कायदेमंडळ पद्धतीचा स्वीकार केला. तसेच संघन्यायालयाची स्थापना या कायद्यानुसार करण्यात आली. भारतीय राज्यघटनेवर १९३५ च्या कायद्याचा प्रभाव बहु अंशी असलेला दिसून येतो.

याशिवाय ट्रिप्स योजना, त्रिमंत्री योजना, लॉर्ड माऊंटबॅटन योजना व भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा यांचाही भारतीय राज्यघटनेवर मोठ्या प्रमाणात प्रभाव आहे. एकंदरीत भारतीय राज्यघटनेची निर्मिती करीत असताना भूतकाळातील सर्व काळामधील विविध घटनांचा मागवा घेण्यात आला आहे.

निरनिराळ्या देशातील आदर्श:-भारतीय संविधान निर्मात्यांनी राज्यघटनेची निर्मिती करीत असताना उत्कृष्ट राज्यघटना निर्माण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणजे विविध देशाच्या राज्यघटनांचा अभ्यास करून त्यातील कोणत्या महत्त्वाच्या बाबी आपणास स्वीकारता येतील, याचाही विचार करण्यात आला. जगातील उत्कृष्ट राज्यघटनांमधून काही महत्त्वाच्या गोष्टी भारतीय राज्यघटनेत स्वीकारण्यात आल्या आहेत हे स्वीकारत असताना संबंधित देशातील सामाजिक सांस्कृतिक व राजकीय परिस्थितीचा प्रथम अभ्यास करण्यात आला. त्यानंतर हे कायदे अथवा तत्वे आपल्या देशातील सर्व परिस्थितीला अनुकूल असतील का? याचाही पूर्ण विचार करण्यात आला. आणि काही महत्त्वाच्या तत्त्वांचा स्वीकार करण्यात आला.

१) इंग्लंड - संसदीय शासन व्यवस्था:- भारतानेस्वीकारलेलीसंसदीयशासनपद्धतीही ब्रिटिश राज्यघटनेतून घेण्यात आलेली आहे. ब्रिटिशांनी भारतावर दीडशे वर्ष राज्य केले होते. आणि ब्रिटिशांची संसदीय शासन पद्धती भारतीयांच्या सवयीचा भाग झालेली होती. त्यामुळे भारतात संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार करूनराष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी ही तत्वे इंग्लंडच्या राज्यघटनेतून घेण्यात आली.
२) अमेरिका:-अमेरिकन राज्यघटनेतून लिखित राज्यघटना उद्देश पत्रिका मूलभूत अधिकार संघराज्य पद्धती न्यायालयीन पुनर्विलोकन अशा महत्त्वाच्या संकल्पनांचा स्वीकार भारतीय राज्यघटनेत करण्यात आला आहे. मात्र या संकल्पनांचा स्वीकार करीत असताना त्या आपल्या देशातील परिस्थितीला अनुकूल ठरतील या पद्धतीने स्वीकारण्यात आल्या आहेत.
३) आयर्लंड:-भारतीय संविधानातील राज्याचे मार्गदर्शक तत्वे आयर्लंडच्या राज्यघटनेतून घेण्यात आलेली आहेत.
४) कॅनडा:- केंद्र व घटक राज्य सत्तेची विभागणी ती कॅनडाच्या संघराज्य पद्धतीवर आधारित आहे.
५) ऑस्ट्रेलिया:-ऑस्ट्रेलियन संविधानातून भारतीय राज्यघटनेत समवर्ती सूची चा स्वीकार करण्यात आला आहे.
६) दक्षिण आफ्रिका:-भारतीय संविधानात दक्षिण आफ्रिकेच्या संविधानातील घटनादुरुस्तीच्या पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे.
७) जर्मनी:-आणीबाणी विषयक तरतुदी जर्मन संविधानातून स्वीकारण्यात आलेल्या आहेत.

वरीलप्रमाणे भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करत असताना केवळ आपल्या ऐतिहासिक घटनांची नोंद घेतली आहे असे नव्हे, तर जगातील विविध राज्यघटना तेथील परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करून भारतीय राज्यघटना निर्माण करण्यात आलेली आहे. हे भारतीय संविधान तयार करण्यासाठी एकूण २९६ सदस्यांची घटना परिषद तयार करण्यात आली होती. भारतीय घटना परिषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांची निवड

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



आली होती. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेचे मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडून दीर्घकालीन लोकशाही शासन व्यवस्था टिकून ठेवण्यासाठी एक उत्कृष्ट संविधान निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आणि या संविधानाच्या माध्यमातून भारताने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला आहे. असे हे महत्त्वपूर्ण संविधान लिहिण्यासाठी संविधान निर्मात्यांना दोन वर्ष अकरा महिने सतरा दिवस एवढा कालावधी लागला.

**निष्कर्ष व समारोप:-**

दीडशे वर्ष ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असलेल्या आणि बहुतांशी विविधता असलेल्या देशासाठी राज्यघटना निर्माण करणे हे मोठे आव्हान होते. परंतु भारतीय घटनाकारांनी हे आव्हान स्वीकारून, भारताच्या ऐतिहासिक घटनांचा, विविध देशाच्या राज्यघटनांचा अभ्यास करून दीर्घकाळ टिकणारे संविधान स्वतंत्र भारतासाठी निर्माण केले आणि आज भारताने स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण केली आहेत.

संदर्भसूची

१) डॉ रात.श्री. मोरवंचीकर-आधुनिक भारत, विद्या बुक पब्लिशर'औरंगाबाद

२) पाटील व इतर-भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद

३) डॉ. विजयकुमार गो कुलकर्णी-भारतीय संविधान शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद.

४) डॉ.मंजिरी कारेकर व डॉ सुवर्णा वेनके-भारताचे शासन आणि राजकारण पिअर्सन, दिल्ली

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani